# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. ३९
# सभा क्र.५६, दिनांक १६/१२/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब (शुक्रवार दि. ०९/१२/२०२२ रोजीची) सभा शुक्रवार, दि. १६/१२/२०२२ रोजी, सकाळी ११.३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिकाभवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र.११८७**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/११/२०२२ ते दि.३०/११/२०२२ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घ.क.व्य.का/४७३२, दि. ६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र.११८८**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे ऑक्टोबर २०२२ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/६४७६, दि. ६/१२/२०२२चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र.११८९**

दि. १४/११/२०२२ ते दि. २०/११/२०२२ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/९२४, दि. ३०/११/२०२२ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र.११९०**

प्रभाग क्र. ३८ ब कात्रज स.नं. ४८/२ येथील ॲमेनिटी स्पेसच्या जागेवर बहुद्देशीय इमारतीचे उर्वरित काम पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. संतोष झेंडे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ३७,२३,७६३/– पेक्षा २६.५५ % कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. २७,३५,१०३=९२ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रू. ६,७०,२७७/– पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १८,३७५=३० अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू. २७,७७५/– अधिक थर्ड पार्टी कंन्सल्टन्सी चार्जेस र.रू. ५५,८५६/– अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार व लेबर, मटेरियल , पेट्रोल/डिझेल यांना भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/९२५, दि.१/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.११९१**

प्रभाग क्र.१० बावधन – कोथरूड डेपो अंतर्गत स.नं.७७/१ कोथरूड येथे अग्निशामक केंद्र उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. तेजदर्शन इन्फ्रा प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू.२,२२,१५,२०५/– पेक्षा १.१७ % कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. २,१९,५५,२८७=१० पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रू. २६,६५,८२५/– अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू. १,१७,७८०/– अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार व लेबर, मटेरियल, पेट्रोल/डिझेल यांना भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/९२६, दि.१/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.११९२**

होमी भाभा हॉस्पिटल पाडून नव्याने विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. विशाल बाबुराव धोत्रे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू.८८,६०,६३६/- पेक्षा १८.९९ % कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७१,७८,००१=२२ अधिक जी.एस.टी. र.रू. १०,६३,२७६/- अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू. ७६,०५५/- पर्यंत टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार व लेबर, मटेरियल , पेट्रोल/डिझेल साठी भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/९२७, दि.१/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.११९३**

हडपसर मुंढवा क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभागा मध्ये टँकरने पिण्याचे पाणी पुरवठा करणे सन २०२२-२३ (भाग१)कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदारमाधव वॉटर सप्लायर्सयांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू.४९,९५,८२५/- पेक्षा ३.६००% कमी (तडजोडीने) ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४८,१५,९७५=३० चे काम उपलब्ध रकमेपर्यंत करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस व ब पाकीट उघडलेचे दि.१६/०९/२०२२ पासून काम सुरू करणेस पश्चात मान्यतेसाठी मा.अति. महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/९२९, दि.१/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.११९४**

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट मांजरी बु. गावात व परिसरात टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार अजिंक्य वॉटर सप्लायर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( पुगप रक्कमेच्या र.रू. २९,९९,५५३/- पेक्षा ३.९०० % कमी सुधारीत दराने) असल्याने त्यांचेकडून र.रू. २८,८२,५७०=४३ चे काम उपलब्ध रकमेपर्यंत करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस व ब पाकीट उघडलेचे पासून काम सुरू करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/९३०, दि.१/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.११९५**

कार्यकारी अभियंता स्वारगेट पाणीपुरवठा क्रमांक १ यांचे कार्यक्षेत्रात येणाऱ्या नव्याने समाविष्ट उंड्री व इतर विविध भागात टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. अमोल रमेश देवकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ३९,९९,४८०/- पेक्षा ८.०० % कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ३६,७९,५२१=६० ची निविदा मान्य करून काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति. महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/९३१, दि.१/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.११९६**

प्रभाग क्र.२६ महंमदवाडी मधील विबग्योर शाळा ते रहेजा प्रिमियर सोसायटीपर्यंत १२ मी. रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ११ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. आदर्श भारत एन्व्हायरो प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ५,१८,५९,०९५/- पेक्षा २१.५५ % कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४,०६,८३,४६०=०३ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. ९३,३४,६३७/- पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू.१६,६५,८८३/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. १,२७,१३५/- ( असे एकूण र.रू. ५,१८,११,११५=०३ पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/९३२, दि. २/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.११९७**

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसाठी मैलापाणी शुद्धीकरण केंद्र बांधणे व ५ वर्षे देखभाल दुरूस्ती करणे या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापनाकरिता ( Project Management Consultant ) तज्ञ सल्लागार नेमणे B-2 पद्धत (Evaluation on QCBS Basis)कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदारShah Technical Consultants Pvt. Ltd. यांचे टेंडर प्राप्त निविदांपैकी एकूण गुणांवरून सर्वाधिक गुण असलेले सल्लागार असल्याने त्यांचेकडून र.रू. २,३८,९०,०००/- रकमेपर्यंतच्या निविदेचे काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि (प्र)/९३३, दि. २/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.११९८**

पुणे महानगरपालिका परिमंडळ ३ अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील कम्युनिटी टॉयलेट (CT), पब्लिक टॉयलेट (PT) व युरीनल यांची देखभाल दुरूस्ती कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदारमे. श्री. केतन भानुदास जगताप यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे(टेंडर र.रू. १,५६,१८,१०४/- पेक्षा -२८.८०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. १,११,२०,०९०=०४ पर्यंत

काम करून घेणेस अधिक १८ % जीएसटी व भाववाढ सुत्रानुसार सिमेंट / स्टील / डांबर यांचे स्टार रेट नुसार अधिक / कमी नुसार अदा/वसूल करणेस व टेस्टिंग चार्जेस अदा करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महापालिका आयुक्त (इस्टेट) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ ३/९३४, दि. २/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.११९९**

पुणे मनपाच्या येरवडा हॉट मिक्स प्लान्ट येथील प्रयोगशाळेमध्ये विविध प्रकारची मशिनरी/उपकरणे खरेदी करणे ( बी–२ पद्धत) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. हायड्रोलिक एण्ड इंजिनिअरिंग इन्स्ट्रोमेंट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून र.रू. ४५,८७,१७४/– पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. ८,२५,६९२/– (असे एकूण र.रू. ५४,१२,८६६) पर्यंत काम करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महापालिका आयुक्त (ई) यांचे जा.क्र. मआ/पथ/९३५, दि. २/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२००**

प्रभाग क्र.१८ घोरपडे पेठ येथील मनपा वसाहत ९ मधील इमारत क्र. डी व ई या इमारती मधील नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी संक्रमण शिबीर (ट्रान्झिट कॅम्प) बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. रोहित कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र. रु. ८९,१२,२७०/– पेक्षा २२.२५% कमी टेंडर दराने) असल्याने त्यांचेकडून र. रू. ६९,२९,२८९=९२ अधिक जीएसटी र.रू. १०,६९,४७२=४० अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र. रू. १६,३५०/– पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार व सिमेंट , स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्राप्रमाणे व लेबर, मटेरिअल, पेट्रोल/डिझेलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेसमान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/९५३,दि. ६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२०१**

नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आरोग्य विभागामार्फत सार्वजनिक स्वच्छता व पडीक हद्दीचे झाडणकाम/साफसफाई करणे (नव्याने समाविष्ट हद्दीसह) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. यु.आर.फॅसिलिटी सर्विसेस व मे. सुमित फॅसिलीटीज लिमिटेड यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र. रु. १४,५१,८५,९८०=१६ पैकी ॲटपार ) असल्याने त्यांचेकडून प्रत्येकी र. रू. ७,२५,९२,९९०=०८ या रक्कमेपर्यंत काम करून घेणेस व सदरील काम १ ऑक्टोबर २०२२ पासून सुरू करणेस (पश्चात मान्यता) अधिक टेंडर अटी व शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतन वाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ अदा करणेसव त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.१/९६०, दि. ६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२०२**

पुणे महानगरपालिकेच्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय येथे ॲनोटॉमी विभाग व फिजिओलॉजी विभागासाठी उपकरणे खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी लघुत्तम दर सादर करणारे ठेकेदार १) आर.एस. एंटरप्रायझेस, २) श्री एंटरप्रायझेस ३) रूतज एंटरप्रायजेस या तीन निविदाधारकांकडून खात्याच्या आवश्यकतेनुसार व मागणी नुसार जीएसटी करासहित रक्कम रु. ३२,२२,७५५/– पर्यंत खरेदी करणेकामी, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांची बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९६१,दि. ६/१२/२०२२ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२२–२०२३,

CE17A242/SJ6-93,

पुणे महानगरपालिकेच्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय येथे ॲनोटॉमी विभाग व फिजिओलॉजी विभागासाठी उपकरणे खरेदी करणे

मान्य तरतूद रक्कम रूपये १००,००,००,०००/– (शंभर कोटी रूपये फक्त )

पैकी ३२,२२,७५५/– ( अक्षरी रक्कम रुपये – बत्तीस लक्ष बावीस हजार सातशे पंचावन फक्त )

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>सर्वात जास्त रक्कमेचे टेंडर्स</u>**

**विषय क्र.१२०३**

पुणे पेठ बिबवेवाडी स.नं.६७०,६७१ इंदिरानगर लोअर पोलिस स्टेशनच्या मागे असलेला १००० चौ.फु क्षेत्राचा हॉल शैक्षणिक वापराकरिता हि मिळकत ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविणेस देणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या तीन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र. १ चे निविदाधारक ज्ञानसागर एज्युकेशन सोसायटी तर्फे श्री.विजय शंकरराव उत्तुरे, पत्ता–९ अ, जनसेवा को–ऑप हौ.सोसायटी,बिबवेवाडी,पुणे–४११०३७ यांची निविदा आली असून त्यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये १,४३,९८३/– (अक्षरी रक्कम रूपये एक लाख त्रेचाळीस हजार नऊशे त्र्याऐंशी फक्त) ही मनपा निर्धारित वार्षिक रक्कम रूपये १,४२,६५६/–(अक्षरी रक्कम रुपये एक लाख बेचाळीस हजार सहाशे छप्पन्न फक्त) पेक्षा रक्कम रूपये १३२७/– (अक्षरी

रक्कम रूपये एक हजार तीनशे सत्तावीस फक्त) ने जास्त असल्याने त्याप्रमाणे आणि शासकीय नियमानुसार प्रतिमहा मक्ता रकमेवर सेवाकर/जी.एस.टी. प्रचलित दराने भरून घेणेस ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेकामी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/९३७, दि. ५/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२०४**

पुणे पेठ बुधवार, महात्मा फुले मंडई परिसरातील आर्यन वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे कामी निविदा मागविल्या असता एकच निविदा आली असता निविदाधारक श्री. परवेश कासम शेख , ५८७, भेलकेवाडी, भोर, पुणे – ४१२२०६ यांची निविदा आली असून त्यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये ४३,००,७२२=६५ ही मनपा निर्धारित वार्षिक रक्कम रूपये ४२,४३,८५५/– पेक्षा रक्कम रूपये ५६,८६७=६५ (१.३४%) ने जास्त असल्याने सदर निविदा स्विकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे प्रतिवर्षी मक्ता रक्कम + २ % आयकर भरून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यासमा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/९५५, दि. ६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>संकीर्ण</u>**

**विषय क्र.१२०५**

पुणे महानगरपालिकेच्या प्रसुतिगृहांसाठी सर्जिकल कन्ज्युमेबल मटेरिअल व कोव्हिड १९ रूग्णांकरिता विविध साधनसामुग्रींची खरेदी करण्यात आलेल्या बिलांची रक्कम रू.८९,४३,०७२/– पर्यंत मा. महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या निविदाधारकांना अदा करणेस , तसेच खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांची बिले अदा करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/ आरोग्य/९२८,दि. १/१२/२०२२ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२२–२३

RE17F133D Surgical Consumable, Disposable Material खरेदी करणे

मान्य तरतूद रक्कम रूपये – २,००,००,०००/– पैकी ८९,४३,०७२/–

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२०६**

प्रभाग क्र. १८ ड मधील विकास कामे करणेसाठी र.रू. ९७/– लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेने मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/९३६, दि. ५/१२/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, बजेट कोड नं. CE17A242/SJ6-93,भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय, | र.रू. ९७/– लक्ष | --- |
| **<u>नवीन सुचविलेली कामे</u>**<br>परिमंडळ क्र. ५,पुणे महानगरपालिका,<br>१) प्र.क्र. १८ ड मध्ये गुरूवार पेठ खडकमाळ आळी परिसरात मुताऱ्यांची व शौचालयांची दुरूस्ती करणे. | --- | र.रू. ५ लक्ष |
| २) प्र.क्र. १८ ड मध्ये शुक्रवार पेठ अंगरशा तकिया परिसरात शौचालय दुरूस्ती करणे. | --- | र.रू. ५ लक्ष |
| ३)प्र.क्र. १८ ड मध्ये १६ नं. शाळेची दुरूस्ती व पेंटींग करणे. | --- | र.रू. १० लक्ष |
| ४)प्र.क्र. १८ ड मध्ये आनंदीबाई कर्वे शाळा, सरदार कान्होजी आंग्रे शाळा दुरूस्ती विषयक कामे करणे . | --- | र.रू. १० लक्ष |
| ५)प्र.क्र. १८ ड मध्ये पुणे मनपा शाळामध्ये फर्निचर विषयक कामे करणे . | --- | र.रू. १० लक्ष |
| ६)प्र.क्र. १८ ड मध्ये सावित्रीबाई फुले स्मारक येथिल दुरूस्ती विषयक कामे करणे . | --- | र.रू. १० लक्ष |
| ७)प्र.क्र. १८ ड मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे . | --- | र.रू. ९ लक्ष |
| ८)प्र.क्र. १८ ड मध्ये रविवार पेठ परिसरामध्ये यु.टी.डब्ल्यु. टी. कॉंक्रिटकरण करणे. | --- | र.रू. १० लक्ष |
| ९)प्र.क्र. १८ ड मध्ये विविध ठिकाणी गल्लीबोळ कॉंक्रिटकरण करणे. | --- | र.रू. १० लक्ष |
| १०)प्र.क्र. १८ ड मध्ये मोमिनपुरा कब्रस्थान सीमाभिंत बांधणे . | --- | र.रू. १८ लक्ष |

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२०७**

पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंअर्थसहाय्यित योजने अंतर्गत सुरू असलेल्या मराठी माध्यमाच्या दोन माध्यमिक शाळा कायमस्वरूपी मनपामार्फत चालविणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्तयांचे जा.क्र. मआ/माध्यमिक व तांत्रिक/९३८, दि. ५/१२/२०२२ चे पत्र.

१) आचार्य आनंदऋषि माध्यमिक विद्यालय, वडगावशेरी (मराठी माध्यम) ही शाळा चालू शैक्षणिक वर्ष २०२२–२३ पासून चालविण्यास व कै. वस्ताद हरीभाऊ पोकळे माध्यमिक विद्यालय, धायरी, पुणे (मराठी माध्यम) ही शाळा शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून कायमस्वरूपी मनपामार्फत चालविण्यासाठी करार पद्धतीने शिक्षक नियुक्त करून त्यांचे दर महाचे वेतन महापालिकेच्या वेतनावरील तरतुदीमधून अदा करण्यास,

२) आचार्य आनंदऋषि माध्यमिक विद्यालय, वडगावशेरी ही शाळा पुणे मनपाने चालविण्यास व त्यासाठी ०३ कंत्राटी शिक्षकांच्या वेतनासाठी दि. ०१/१२/२०२२ ते ३०/०४/२०२३ पर्यंत शिक्षकांचे मानधन –ठए१३अ१५७ या अर्थशिर्षकामधून रक्कम रूपये २,६२,५००/– येवढा संभाव्य खर्चाची तरतूद करून दरमहाचे करार पद्धतीच्या शिक्षकांचे वेतनाचे बिल अदा करणेस.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२०८**

पुणे महानगरपालिकेच्या मुख्य अभियंता (पथ) कार्यालयास सन २०२२–२३ मध्ये उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूदीमधून ७,८५,१७,००८/– खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबतमा.महापालिका आयुक्तयांचे जा.क्र. मआ/पथ /९३९, दि. ५/१२/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक,मुख्य अभियंता (पथ) कार्यालय,पुणे महानगरपालिका, बजेट कोड नं. RE20B120/R12-219, पुणे महानगरपालिका येरवडा हॉट मिक्स प्लान्टकरिता घेतलेल्या डांबर/एल.डी.ओ./खडी उचल रकमेचे रिकुपमेंट बिल ( पान क्रमांक –०९, परिशिष्ठ क्रमांक – ७, र.रू. २५००.०० लक्ष पैकी ) | र.रू.७,८५,१७,००८/– | --- |
| **नवीन सुचविलेली कामे**<br>मुख्य अभियंता (पथ) कार्यालय, पुणे महानगरपालिका,<br>१) आंबेगांव बुद्रुक येथील दळवीनगर ते भुमकर चौक दरम्यानचा रस्ता एफ डी आर व मायक्रो सरफेसिंग (फायबर) पद्धतीने विकसित करणे. | --- | र.रू.३,९२,३१,००१/– |
| २) बिबवेवाडी रस्ता व्ही आय टी कॉलेज ते डॉल्फिन चौक एफ डी आर व मायक्रो सरफेसिंग (फायबर) पद्धतीने विकसित करणे. | --- | र.रू.३,६५,५१,९७४/– |
| ३) शंकर शेठ रोड स्वारगेट चौक ते कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दी पर्यंतचा रस्ता मायक्रो सरफेसिंग (फायबर) पद्धतीने विकसित करणे. | --- | र.रू. २७,३४,०६०/– |

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२०९**

दिनांक ०४ डिसेंबर २०२२ रोजी ३६ वी पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी विजेते खेळाडूंना पारितोषिक स्वरूपात धनादेश / आरटीजीएस द्वारे रक्कम रूपये ३५,००,०००/– अदा करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/क्रिडा/९४० दि. ५/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२१०**

जुना प्रभाग क्र. १८ आचार्य विनोबा भावे शाळेमधील सिमाभिंत बांधणे व दुरूस्ती करणेसाठी र.रू. ७० /– लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/९४२, दि. ५/१२/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, भवन विभाग,पुणे महानगरपालिका,<br>नव्याने समाविष्ट झालेल्या गावातील शाळांमध्ये दुरूस्ती व सुधारणा कामे करणे. CE12A422/J2-21. | र.रू. ७० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे**<br>भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय,पुणे महानगरपालिका<br>१) जुना प्रभाग क्र. १८ आचार्य विनोबा भावे शाळेमधील सिमाभिंत बांधणे | --- | र.रू. २५ लक्ष |
| २) जुना प्रभाग क्र. १८ आचार्य विनोबा भावे शाळा येथील मैदानाची सिमाभिंत बांधणे | --- | र.रू. २५ लक्ष |
| ३) जुना प्रभाग क्र. १८ आचार्य विनोबा भावे शाळेचे मैदान विकसित करणे. | --- | र.रू. १० लक्ष |
| ४) जुना प्रभाग क्र. १८ आचार्य विनोबा भावे शाळेतील शौचालय दुरूस्ती विषयक कामे करणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | र.रू. १० लक्ष |

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२११**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ ब अन्वये यापुढील आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकामध्ये उर्वरित कामासाठी र.रू. ११,४०,२७,९८३/– या प्रमाणे उपलब्ध करणे आवश्यक आहे. तरी पीएमसी कॉलनी राजेवाडी, नानापेठ, पुणे या ठिकाणच्या अस्तित्वात असलेल्या दोन जुन्या इमारती पाडून त्या ठिकाणी नवीन पार्किंग + ६ मजले असलेली इमारत बांधून पीएमसी कॉलनी राजेवाडी या मनपा वसाहतीची पुर्नबांधणी करणे या कामासाठी र.रू.११,४०,२७,९८३/– कोटी पर्यंत अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध करणे व त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाचे दायित्व स्विकारण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील १९४९ चे कलम ७२ ब अन्वये मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/९४३ दि. ५/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२१२**

भवन रचना विभागाकडील विविध विकासकामे पूर्ण करणेसाठी र.रू. १००/– लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्तयांचे जा.क्र. मआ/भवन/९४४, दि. ५/१२/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, भवन विभाग, पुणे महानगरपालिका, गोखलेनगर येथील बी.डी. किल्लेदार मार्केटचे उर्वरित बांधकाम पूर्ण करणे.बजेट कोड नं.CE29A22/S29-256+ | र.रू. १०० लक्ष | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे</u><br>भवन विभाग,पुणे महानगरपालिका<br>१) प्रभाग क्र. ३५ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलाची अपूर्ण कामे पुर्ण करणे. | --- | र.रू. २५ लक्ष |
| २) प्रभाग क्र. ३२ वारजे येथील क्रीडा मैदानासह क्रीडा संकुलाची कामे पूर्ण करणे | --- | र.रू. २० लक्ष |
| ३)बावधन खुर्द स.नं. १९ येथील आरक्षित जागेवर प्ले. ग्राऊंड (पी.जी.१२ ) वर ॲडव्हेंचर गेम पार्क व बालभवनाची कामे पूर्ण करणे | --- | र.रू. २५ लक्ष |
| ४) प्र.क्र. ३४ ब मधील हिंगणे खुर्द स.नं. १९ येथील खेळासाठी आरक्षित असलेल्या जागेवर क्रीडा संकुलाचे काम पुर्ण करणे. | --- | र.रू. ३० लक्ष |

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२१३**

पाणीपुरवठा विभागाकडील सन २०२२–२३ चे क अदांजपत्रकातील भांडवली कामातील शिल्लक रकमेतून पाणीपुरवठा महसुली कामे करणेकरिता मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार र.रू. ८२००/– लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पा.पु./९४५, दि. ५/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२१४**

सन २०२२–२३ सामान्य प्रशासन विभागाकडील अंदाजपत्रकीय तरतुदीमधील RE11D127D या अर्थशिर्षकाधून र.रू. ६,००,०००/–RE11D127 या अर्थशिर्षकावर खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/९५४, दि. ६/१२/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,<br>पुणे महानगरपालिका,<br>बजेट कोड नं.RE11D127D<br>अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजन करणेसाठी खर्च . | र.रू. ६ लक्ष | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे</u><br>सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका,<br>RE11D127<br>२. आस्थापना संकीर्ण | | र.रू. ६ लक्ष |

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२१५**

अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाकडील सन २०२२–२३ चे अ अंदाजपत्रकातील महसुली कामे करणेकरिता र.रू. ३ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता

मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/९५६, दि. ६/१२/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, अतिक्रमण विभाग, पुणे महानगरपालिका, हॉकर्स सर्वेक्षण व अतिक्रमण निर्मुलन कक्ष<br>बजेट कोड नं. RE25B108 | र.रू. ३ लक्ष | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे</u><br>अतिक्रमणविभाग,पुणे महानगरपालिका,<br>अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग<br>सन २०२२-२३ चे अ अंदाजपत्रकातील महसुली कामे करणे .<br>बजेट कोड नं.RE25B103 संकीर्ण | | र.रू. ३ लक्ष |

**निर्णय- सदर विषयपत्र मागे घेण्यात आले.**

**विषय क्र.१२१६**

पुणे पेठ धनकवडी स.नं. १०/१/२/३/१ अ मधील न.भू.क्र. १८६ येथील मिळकतीमधील २४ मी. डी.पी. रस्त्याने बाधित जागा रोख स्वरूपात मोबदल्यापोटी ताब्यात घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/९५८, दि. ६/१२/२०२२ चे पत्र.

१) पुणे पेठ धनकवडी स.नं. १०/१/२/३/१ अ मधील न.भू.क्र. १८६ येथील मिळकतीमधील २४ मी . डी.पी. रस्त्याने बाधित ५८९ चौ.मी. क्षेत्रापैकी ५०% क्षेत्र म्हणजेच २९४.५ चौ.मी. क्षेत्राचे विधी विभागाच्या अभिप्रायास अधीन राहून रोख मोबदला ( मुल्यांकन + व्याज+ दिलासा रक्कम ) एकूण देय रक्कम रू. ९८,०९,०६५/- व यावर मे. शासन दरबारी आवश्यक ती स्टँप ड्युटी ७% ( ६,८६,६३७=६,८६,६५०/-)व रजिस्ट्रेशन फी रक्कम रू. ३०,०००/- अशी एकूण र.रू ७,१६,६५०/-इतकी अर्थसंकल्प सन २०२२-२३, पथ विभागाचे बजेट कोड-उए२०अ१२४८/अ५-१ मधून अदा करणेस.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२१७**

आरोग्य खात्याकडे ११ महिन्याच्या कालावधीसाठी करार पद्धतीने मुलाणी या पदाची नियुक्ती करण्यासाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९५९, दि. ६/१२/२०२२ चे पत्र.

१. जाहिरात क्र. ०१/१११३ दि.१८/०२/२०२२नुसार अर्जाद्वारे मुलाणी या पदाकरिता विहित नमूद केलेली शैक्षणिक पात्रता,शैक्षणिक पात्रतेतील गुणांकन तसेच उमेदवारांचा अनुभव यास अनुसरून तयार करण्यात आलेला निवड समितीचा छाननी अहवाल स्वीकृत होणेस.
२. मुलाणी या पदाकरिता निवड समितीने निवड यादीमधील शिफारस केलेल्या ६ मुलाणी सेवकांना आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने नियुक्ती आदेश देणेबाबत.
३. निवड यादीतील उमेदवाराने नियुक्ती न स्वीकारल्यास अथवा नियुक्ती नंतर हजर न झाल्यास प्रतीक्षा यादीवरील सेवकास आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने नियुक्ती आदेश देणेबाबत.
४. जाहिरातीमध्ये नमूद केल्यानुसार मुलाणी सेवकांना रू.१७२०५/- प्रतिमहा अथवा किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार अकुशल कामगारांचे किमान वेतन निश्चित केल्या प्रमाणे एकवट वेतन अदा करणेस.
५. सदर नियुक्तीच्या कालावधीत एकवट वेतनावरील सेवकांना नेमणूक कालावधीत किरकोळ रजा प्रत्येक महिन्याला एक दिवस या प्रमाणात देणेस व त्याप्रमाणे आजारपणाच्या रजेची निकड भासल्यास अत्यावश्यक गरज म्हणून प्रत्येक महिन्याला एक दिवस ह्या प्रमाणात वैद्यकीय रजा देणेस .
६. मुलाणी (अ.ज.-२,विजाअ-१,भजब -१,भजक-१ )एकूण ५ या उर्वरित रिक्त पदांची दोन वेळा जाहिरात देऊन उपलब्ध होत नसल्याने रद्द करणेस.
७. कत्तलखाना कामकाजासाठी नियुक्त होणाऱ्या मुलाणी सेवकांचे वेतन हे कोंढवा कत्तलखाना ऑपरेशन व मे ंटेनन्स करणे RE17F199 या अर्थशीर्षकावरील तरतुदीतून अदा करणेस.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**सही/-xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**सही/-xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**